जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०६/२०२३
## दि.१५/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १३६/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४९,महा.पो.का.क.३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | रियाज खान,वय-३८ वर्षे,रा.५५०,सत्तारखान चाळ,नाना पेठ,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम,त्याची पत्नी,मुलगा व वडील (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०६/२०२३ रोजी १८/३० वा. एल.अरुण दुकाना समोरील रोडवर,अप्पा मिसळवालेच्या शेजारी नाना पेठ,पुणे येथील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे भाऊ आरीफ महेबुब खान,वय-३५ वर्षे,रा.लेन नं.२३,शिवनेरी नगर,कोंढवा-खुर्द, पुणे याचेसह नमुद ठिकाणी दुचाकीचे रिपेअरींगचे काम करीत असतांना,यातील नमुद इसमाने जुन्या भांडणाचा राग मनात धरुन,त्याचेसोबत असलेल्या इतरांनी आरीफ यास शिवीगाळ करून,त्याचे कानाखाली चापट मारुन,इसको बहुत मस्ती आयी है,आज इसको खत्म कर देंगे असे म्हणुन धारधार हत्याराने आरीफ यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यात व पाठीवर वार करुन जखमी केले आहे. तसेच सदर ठिकाणी पडलेले साहित्य उचलुन आरिफ याचे अंगावर फेकुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर शिवीगाळ व आरडा-ओरडा करुन,त्यांचे हातातील धारदार हत्यारे हवेत भिरकावुन सदर परिसरात नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सौरभ माने ९९७०६११५३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २९४/२०२३,भादविक ३९४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २० वर्ष,रा.कलवडवस्ती,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०६/२०२३ रोजी रात्री २०/३० वा. लोहगाव स्मशान भुमी लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचेकडील रिक्षा मध्ये ओलावरून ऑनलाईन पॅसेंजरचे भाडे घेवुन,खराडी बायपास येथुन लोहगाव येथे जात असताना,लोहगाव स्मशान भुमी जवळ आले असता,त्यावेळी त्यांचे रिक्षाचे समोर चार अनोळखी इसमांनी संगनमत करून,नमुद ठिकाणी येवुन,त्यांची रिक्षा थांबवुन,रिक्षा मधील पॅसेंजर यांना जबरदस्तीने खाली उतरवले. त्यानंतर फिर्यादी यांना काठीने,हाताने,लाथा बुक्यांनी मारहाण करून त्यांना दुखापत करून,फिर्यादी यांचेकडील मोबाईल फोन व ॲटो रिक्षा नं.MH/12/JS/5885 व मोबाईल फोन असा एकुण ५४,०००/- रूपये किमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय चंदन ८३५५९१७६३१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २७९/२०२३,भादविक ३१८ |
| **फिर्यादी** | दिनेश जाधव, पोलीस अंमलदार, वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात व्यक्ती किंवा महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०६/२०२३ रोजी १६/३० वा.चे पुर्वी राजीव गांधीनगर,मॅस्ट्रोस सोसायटी,साळुंखे-विहार रोडचे कडेला असलेल्या कचरा टाकण्याच्या सार्वजनिक ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत |

| | |
|---|---|
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात व्यक्ती किंवा महिला हिने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन नुकतेच एक पुरूष जातीचे जन्मलेले नवजात अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,त्याचे पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,उघडयावर टाकुन निघुन गेल्याने ते अर्भक मयत झाले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जयवंत जाधव ९७३०५१८४८३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ९४/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६९ वर्षे,रा.३२८,गणेश पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०६/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा.ते सकाळी १०/०० वा.चे दरम्यान काळभैरवनाथ मंडळा शेजारी, २८६,गणेश पेठ,पुणे येथील शंकराचे मंदिरात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जुने पेशवेकालीन असलेल्या शंकराचे मंदिराची देखभाल करून,त्याची पुजाअर्चा करीत असतात. शंकराच्या पिंडीच्या पाठीमागील भिंतीस देऊळ असुन,त्यामध्ये शंकराची पितळेची मुर्ती ठेवलेली असताना,कुणीतरी अज्ञात इसमाने,शंकराचे मंदिराच्या उघडया दरवाज्या वाटे आत मध्ये प्रवेश करुन,एक शंकराची पितळी धातुची अंदाजे ०७ किलो वजनाची मुर्ती २,१००/- रू किची चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, प्रतिक्षा शेंडगे ७०२०२६५२३२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २९५/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | बापु जाधव,वय ४७ वर्षे,रा.मु.पो.न्हावरे,ता.शिरूर,जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०६/२०२३ रोजी दुपारी १३/१० वा. पाचवा मैल बस स्टॉप चंदननगर,पुणे येथे नगर-पुणे रोडवर पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पीएमपीएमएल बसने तळेगांव ते पाचवा मैल बस स्टॉप चंदननगर,पुणे येथे नगर-पुणे रोडने प्रवास करीत असताना,सदर प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पॅन्टचे आतील खिशातील ३६,०००/- रूपये रोख रक्कम चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, व्ही.बी.भोसले ९९७५२०८७६८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २८०/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५३ वर्षे,रा.महंमदवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०२३ रोजी सकाळी ०७/१५ वा. फातीमानगर चौक,पुणे-सोलापुर रोड,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे कुटंबासह फातीमनगर चौक,पुणे-सोलापुर रोड,वानवडी पुणे येथे संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखीचे दर्शन घेत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ६०,०००/- रुपये किंमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एस.के.कुंभार ९८२३३४२५१४ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७७/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६५ वर्षे,रा.हांडेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा.गोंधळेनगर कमानी जवळ हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसह गोंधळेनगर कमानी जवळ हडपसर,पुणे येथे संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखीचे दर्शन घेत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ६०,०००/- रुपये किंमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एस.टी.पांडुळे ९५२७९५४३४३ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७८/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | महेश माळी,वय-२८वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०२३ रोजी सकाळी ०८/३० वा. गाडीतळ पी.एम.पी.एल. बस डेपो हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गाडीतळ पी.एम.पी.एल.बस डेपो हडपसर,पुणे येथे संत श्री.ज्ञानेश्वर महाराजांचे पालखीचे दर्शन घेत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची साखळी ४०,०००/- रुपये किंमतीची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | महिला पोलीस अंमलदार, सुजाता गायकवाड ९७६३७२८१४७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**